# नेहरूंचा आंतरराष्ट्रीयवाद

**मनिषा मधुकर कुरणे,**संशोधक विद्यार्थीनी,राज्यशास्त्र विभाग,शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर.

**प्रस्तावना**

पंडित जवाहरलाल नेहरु भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील नेते व स्वातंत्र्यनंतर स्वतंत्र भारताच्या जडणघडणीत अत्यंत महत्त्वपुर्ण भूमिका त्यांनी बजावली. भारतीय राजकीय इतिहासात आपल्या विचारांचा व कार्याचा ठसा ठळकपणे नेहरुंनी उमटवला. पंडित नेहरुंचा राजकीय कर्तृत्त्वाचा कालखंड आणि क्षेत्रे विविध प्रकारची आहेत. भारतीय तसेच आंतरराष्ट्रीय इतिहासाची चांगली जाण, भारतीय संस्कृतीचा परंपरांचा चांगला अभ्यास, भारतीय लोकांचे मागासलेपण, भारतीय लोकांच्यात दारिद्रय, अज्ञान आणि गुलामगिरीचा वारसा, देशातील समस्यांची देखील त्यांना जाणीव होती. संपन्न विचाराबरोबर, कार्यकुशलता, राष्ट्रीय – आंतरराष्ट्रीय प्रश्नांची जाण त्यांना होती. पंडित जवाहरलाल नेहरू परिपुर्ण राष्ट्रवादी आंतरराष्ट्रीयवादीदेखील म्हणून त्यांची ओळख आहे. तत्कालीन इतर कोणत्याही नेत्यापेक्षा नेहरुंची आंतरराष्ट्रीय राजकारणाविषयीची दृष्टि प्रगल्भ होती. आंतरराष्ट्रीय घडामोडी संदर्भातील, संबंधातील अंत:प्रवाहाची माहितीही त्यांना आधिक असल्याचे दिसून येते.

**संशोधन पध्दती:** विश्लेषणात्मक व टिकात्मक परिक्षण

**तथ्य संकलन**: दुय्यम साधने

**उद्दिष्टे**

१. नेहरुंच्या आंतरराष्ट्रीयवादी विचारांचा अभ्यास करणे.
२. नेहरुंच्या परराष्ट्र धोरणाचा अभ्यास करणे.
३. नेहरु राष्ट्रवादाकडून आंतरराष्ट्रवादाकडे

**गृहितके**

१. नेहरुंच्या आंतरराष्ट्रीय विचारांचे योगदान
२. नेहरुंच्या आंतरराष्ट्रीयवादाबद्दलची मांडणीचा अभ्यास
३. नेहरुंच्या आंतरराष्ट्रीयवादी विचारांची समकालीन प्रस्तुतता

**राष्ट्रवादाकडून आंतरराष्ट्रीयवादाकडे**

पंडित नेहरुंनी आपल्या राष्ट्रवादाच्या तत्त्वज्ञानाचा समन्वय वैश्विक बंधुभाव आणि वैश्विकतेच्या तत्त्वज्ञानाशी घालत होते. भारतातच नव्हे तर संपुर्ण जगामध्ये त्यांनी समन्वयाचा आग्रह धरला. हे त्यांचे खास वैशिष्टय मानावे लागेल. त्यांच्यामते आंतरराष्ट्रीयवाद म्हणजे स्वतंत्र राष्ट्रांचे समान हितासाठी एकत्र येऊन सहकार्य करणे होय. साम्राज्यवादी व्यवस्थेतून जागतिक संघराज्य कधीच निर्माण होऊ शकत नाहीत. स्वतंत्र राष्ट्रेच वैश्विक आंतरराष्ट्रीयत्वाला हातभार लावू शकतील कारण, पारतंत्र्यातील राष्ट्रे आंतरराष्ट्रीयत्वाचा विचार न करता स्वत:च्याच स्वातंत्र्याचा विचार करतील तथाकथित प्रखर राष्ट्रवादाचे दोष त्यांना ठळकपणे जाणविल्यामुळेच ते आंतरराष्ट्रीत्वाकडे खेचले गेले. संपुर्ण जग परस्परावलंबी घटकांचे मिळून बनलेले आहे. त्यामुळे कोणत्याच एकाकी राहणे शक्य नाही. अशी त्यांना खात्री झालेली होती. एखादया राष्ट्राची प्रगती व त्याचे सामर्थ्य, ऐक्य राष्ट्रवादावर अवलंबुन असते पण त्याला आंतरराष्ट्रीयवादी वृत्तीची जोड नसल्याने ते आंतरराष्ट्रीयत्वास मारक ठरते. आंतरराष्ट्रीयत्वाला पोषक व पूरक ठरणाऱ्या शांततामय मार्गाचा पुरस्कार त्यांनी केला. मानव जातीच्या अस्तित्वासाठी सहजीवन, सहिष्णूतेचे पालन आपण करायला पाहिजे ते करता आले नाही तर मानव जातीचे अस्तित्वच शिल्लक राहणे कठीण होईल. नव्या जगाचे तत्वज्ञान नवनिर्मितीच्या रुपाने दिले.

**परराष्ट्र धोरण**

नेहरूंचे परराष्ट्र धोरण हे त्यांच्या व्यक्तिमत्व विशेषणातून साकार झाल्याचे आपणास दिसते. त्या व्यक्तीविशेत्वाचे गुण त्यांच्या परराष्ट्र धोरणात पर्यायाने आंतरराष्ट्रीयत्वात दिसतात. नेहरूंचे परराष्ट्र धोरण हे व्यापक मानवतावादी आणि

शांततावादी दृष्टिकोनातून विकसित झालेचे दिसते. त्यामुळे मर्यादित राष्ट्रवादी दृष्टिकोनातून बघून चालणार नाही. नेहरूंचे परराष्ट्र धोरण हे 'असलग्नता' गटनिरपेक्ष, तटस्थता या नावांनी ओळखले जाते. परंतू स्वत: नेहरूंनी आपल्या धोरणाचे वर्णन Positive Policy of Peace म्हणजे (शांततेची सकारात्मक योजना) या शब्दात केले आहे. ज्या परिस्थितीत नेहरूंनी हे धोरण अवलंबिले त्यावेळी जग दोन बलाढय, आक्रमक राष्ट्र गटांमध्ये विभागले होते. भांडवलशाही विरूध्द साम्यवाद अशा संघर्षाचें रूपांतर अणुयुध्दात होऊन जगाच्या विनाशाची वाटचाल होणार हे स्पष्ट दिसत होते. त्याचा परिचय जपानच्या हिरोशिमा आणि नागासाकी मध्ये दाखवून दिलाच होता. त्यामुळे युध्दपवित्र्यात असणाऱ्या राष्ट्रांच्या बाजूने न राहता राष्ट्रांनी आपल्या राष्ट्राबाबतचे निर्णय स्वत: घेता आले पाहिजेत असे नेहरूंचे धोरण होते. यातूनच गटनिरपेक्षतेचे धोरण त्यांनी अवलंबिले. ?

अलिप्ततावाद म्हणजे कोणत्याही लष्करी करारापासून दूर राहणे ही भूमिका जरी नकारात्मक वाटली तिचा वस्तुत: अर्थ आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता विकास याबाबत जाणीवपुर्वक स्वतंत्र भूमिका घेणे होय. भारत स्वतंत्र होऊन आंतरराष्ट्रीय राजकारणात जेव्हा उतरला तेव्हा भारताच्या मताला फारसे महत्त्व नव्हते. परंतू नेहरूंच्या अलिप्ततावादी धोरणाने जगाचे लक्ष वेधले. आंतरराष्ट्रीय प्रश्नावर पुर्वग्रह दुषित निर्णय घेणारा देश म्हणून भारत अशी भारताची ओळख जगाला झाली.

**पंचशील तत्व— नेहरूंचे आंतरराष्ट्रीय राजकारणातील योगदान**

पंचशील तत्व ही नेहरूंनी आंतरराष्ट्रीय राजकारणाला दिलेली एक तत्वप्रणाली, वर्तनप्रणाली म्हणून अमुल्य देणगी म्हणावी लागेल. या पंचशील तत्वांमध्ये विचारसरणीचा खोटा दुराग्रह न धरता युध्दाच्या कटू स्मृती न पाळता, त्यांना आंतरराष्ट्रीय व्यवाहारातील अडसर न होऊ देता, राष्ट्रांनी परस्पर आंतरिक हस्तक्षेप टाळावा. अशी आंतरराष्ट्रीय वर्तनाला मार्गदर्शक पंचशील तत्वांची प्रणाली नेहरुंनी सुचविली होती. ती पाचतत्वे म्हणजे परस्परांच्या ऐक्याबद्दल व सार्वभौमत्वाबद्दल सन्मान, अनाक्रमण, परस्परांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करणे. समानता व अनोन्यपकारात्व आणि शांततामय सहजीवन बर्मा, यूगोस्लाव्हिया, सोव्हिएत देश व पाठोपाठ अनेक राष्ट्रांनी या तत्वांना मान्यता दिली. बाटूंग परिषदेत जागतिक शांतता व सहकार्याच्या जाहिरनाम्यात ती समाविष्ठ करण्यात आली. नेहरूंच्या मते आंतरराष्ट्रीय सहजीवन सौजन्य, सहकार्य, सहिष्णूता, सहानुकंपा व सदिच्छाच मानवाला या बाबतीत मदत करु शकतील.

**नेहरूंच्या धोरणावरील टिका**

भारताचे नेहरुकालीन परराष्ट्र अलिप्ततावादी धोरण हे त्यातील गुणदोषासह नेहरूंचे होते. राजनिती संकल्पनांच्या चौकटीत ते बसत नाही. यामुळे बऱ्याचदा या त्यांच्या धोरणावर टिकाही झाली आणि जगातील नामवंत विचारवंतानी त्यांच्या धोरणांचा गौरवही केला. युध्दसज्ज कोणत्याही राष्ट्राला जाऊन मिळणे म्हणजे आंतरराष्ट्रवादाला हानीकारक ठरणे होय. या त्यांच्या धोरणावर बऱ्याचदा टिका होते. भारताचे भौगोलिक स्थान पाहता तसे शक्य होत नाही. विशिष्ट मुल्यांसाठी लढल्या जाणाऱ्या युध्दापासून भारत अलिप्त राहू शकत नाही. याच भुमिकेतून भारताने विविध संघटनातून काम केले. कॉंगो, सायप्रस, व्हिएतनाम या ठिकाणी विधायक कार्य केले. तेव्हा त्यांच्या धोरणाला तटस्थ म्हणता येणार नाही. कोणावर स्वामित्व नको, स्वातंत्र्य अबाधित राखून कोणत्याही गटाशी सलग्न राहणे, जागतिक शांततेला पोषक वातवरण तयार करु, लष्करी गट आंतरराष्ट्रीयत्वाला विसंगत असल्यामुळे एखादया राष्ट्राचे नेतृत्व करणे त्यांना मान्य नव्हते. पण कोणत्याही राष्ट्रांची जबाबदारी घेणे त्यांना मान्य होते. ही त्यांची भूमिका विसंगत वाटते. काश्मिरचा प्रश्न युनोत मांडले व चीनच्या युध्दातून अचानक सैन्य मागे बोलावणे हे देखील त्यापैकीच निर्णय ज्याचे परिणाम आजमागायत भारताला भोगावे लागत आहेत.

**नेहरू विचारांची समकालीन प्रस्तुतता**

नेहरुंनी मानलेल्या आंतरराष्ट्रीय संबंधाची जी कल्पना आहे. त्यामध्ये सांस्कृतिक, आर्थिक, तांत्रिक स्वरुपातील देवाण—घेवाण करुन सहकार्याची भूमिका मांडली. ती

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत काही अंशाने अंमलबजावणी होताना दिसत आहे. पण नेहरूंच्या विचारानुसार जग भांडवलशाहीच्या केंद्रीकरणाकडे झुकता कामा नये. तसेच नेहरूंच्या विचारानुसार जग अगदी जवळ आले आहे आणि नेहरुंनी सांगितलेल्या पंचशील तत्वांचे पालन केल्यास जागतिक पातळीवर असणारे प्रलंबित प्रश्न, मागण्या, युध्दसदृश्य परिस्थिती, अंतर्गत बंडाळी, सीमावाद, साम्राज्यवाद अशा प्रश्नांची सोडवणूक शांततेच्या मार्गाने होऊ शकते. प्रस्थापित भांडवलशाही देशांच्या खोटया हाव्यासापोटी अविकसित राष्ट्रांच्या सार्वभौमत्वाची पायमल्ली रोखता येईल.

**निष्कर्ष**

नेहरुंच्या आंतरराष्ट्रीयतेचा अर्थ फक्त युध्दाचा कलहाचा अभाव असा नसून आंतरराष्ट्रीय जीवनातील सक्रिय सहभाग असा होता. त्यांच्या आंतरराष्ट्रीय विचारात सहयोग, सांस्कृतिक देवाण—घेवाण, तांत्रिक देवाण—घेवाण, व्यापाराला उत्तेजन, राष्ट्रा—राष्ट्रात सहकार्य तसेच शांततेचा विस्तार वाढविण्याची ही क्षेत्रे आहेत. यातच मानवी कल्याणाचे सार आहे असे नेहरूंना वाटते. या सर्व गोष्टी प्रत्येक राष्ट्राने आपल्या धोरणात अवलंबिल्या तरच जग शांततामय जीवन, मानवी कल्याण साधेल असे नेहरू म्हणतात.

आजच्या जागतिकीकरणाच्या जगात जेथे पुन्हा एकदा माणूस भांडवलशाहीच्या कचाटयात त्याने सापडतोय कि काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. अशावेळी नेहरुंच्या या विचारांची आपणास निश्चितच गरज दुर्बलाच्या विकासाच्या दृष्टीने भासणार आहे आणि म्हणूनच त्यांचे विचार आजही प्रस्तुत ठरतात.

**संदर्भसूची**


१. राजूरकर न. गो., कुरूंदकर नरहर,(जाने.२००८) ‘पंडित नेहरू एक मागोवा’, पद्गंधा प्रकाशन पुणे.
२. गाडगीळ स.रा. (ऑक्टो. १९९४), ‘नव भारताचे शिल्पकार पंडित जवाहरलाल नेहरू’, शलाका प्रकाशन, मुंबई.
३. कुंभार नागोराव, (डिसें. १९८९), ‘पंडित नेहरू:विचार दर्शन’, आई प्रकाशन, लातूर.
४. अकबर एम. जे., (सप्टेंबर २०१५), ‘पंडित जवाहरलाल नेहरू’, राजहंस प्रकाशन, पुणे.
५. सारथी अरुण, (सप्टेंबर २०१६), ‘पंडित जवाहरलाल नेहरू खिलापत ते काश्मीर अस्मिता, प्रकाशन पुणे.
६. काळे. वि. र., (डिसेंबर २००५) पंडितजी तेंडुलकर प्रकाशन, मुंबई.
७. गोपाळ एस., (१९९४) ‘जवाहरलाल नेहरू’, साहित्य अकादमी प्रकाशन, मुंबई.